# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**

ई-मेलः **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in

## प्रसिध्दी पत्रक

### एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांकरिता सक्तीची दुसरी सुट्टी टाळण्याकरिता महावितरण कंपनीचा प्रस्ताव

एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांकरिता सक्तीची दुसरी सुट्टी टाळण्याकरिता अतिरिक्त महागडी वीज खरेदी करणे आणि त्यावरील खर्च अतिरिक्त रिलायेबिलीटी आकाराद्वारे वसूल करण्यास आयोगाची मंजूरी घेण्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महाविरण कंपनी) ने एक प्रस्ताव सादर केला होता. या प्रकरणी आयोगाने दिनांक ६ डिसेंबर, २००७ रोजी मुंबई येथे जाहीर सुनावणी घेतली.

२. आयोगाने या प्रकरणी दिनांक २१ जानेवारी, २००८ रोजी आदेश पारित केला आहे. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत-

(अ) महागडी वीज खरेदी करून सक्तीची दुसरी सुटी टाळण्यासाठी प्रत्येक वेळी पूर्व-परवानगी घेणे तसेच रिलायेबिलीटी आकारास मंजूरी घेणे आवश्यक आहे. कारण याबाबतीतील प्रत्येक प्रस्ताव विशिष्ट विभागाशी संबंधित असतो तसेच रिलायेबिलीटी आकाराला कार्योत्तर मंजुरी देता येत नाही, म्हणून आयोगाला महावितरणची ही विनंती मान्य करता येत नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एआयडीसी) च्या क्षेत्रातील संबंधित सर्व उद्योगांना वेगळ्या फीडरद्वारे वीज पुरवठा करणे, तसेच स्वतंत्ररित्या निश्चित करावयाचा रिलायेबिलीटी आकार भरण्याची त्यांची तयारी असणे, आवश्यक आहे.

(ब) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६४ मध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन, वार्षिक वीज दर निश्चित करतेवेळी, रिलायेबिलिटी आकार लागू करण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर विचार करता येईल.

(क) विजेच्या मागणी-पुरवठ्यातील तफावत ४५०० मेगावॉटहून अधिक झाल्यास आणि कोणत्याही वर्गवारी/विभागाकरिता भार नियमन प्रति दिवशी १२ तासाहून अधिक झाल्यास औद्योगिक ग्राहकांना सक्तीची दुसरी सुट्टी लागू करता येईल. विजेच्या मागणी-पुरवठ्यातील तफावतीच्या अंदाजाकरिता कोणतीही तर्कसंगत कारणमीमांसा महावितरणने दिली नसल्याने, अशी सक्तीची दुसरी सुट्टी लागू करण्याकरिता मत व्यक्त करण्यास आयोग असमर्थ आहे.

(ड) सक्तीची दुसरी सुट्टी टाळण्याकरिता औद्योगिक ग्राहक अतिरिक्त पुरवठा आकाराचा भरणा आधीच करीत आहेत, त्यामुळे भार नियमन शिथील करण्याकरिता त्यांनी आणखी जादा रक्कम भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे आयोगाचे मत आहे.

(इ) एमआयडीसीच्या सल्लागाराने सांगितले होते की महावितरण कंपनीच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात असलेल्या एमआयडीसीच्या विभागाकरिता महावितरण कंपनीची फ्रँचायसी म्हणून काम करण्याचा त्यांचा प्रस्ताव आहे आणि फ्रँचायसी म्हणून वीज प्राप्त करणे हे एमआयडीसीचे एक काम असू शकते. ही बाब विचारात घेऊन सुचविण्यात येते, की महावितरण कंपनी आणि एमआयडीसीने एक नवीन संयुक्त याचिका सादर करावी. त्या याचिकेसोबत महागडी वीज प्राप्त करण्याच्या गरजेसंबंधीची पुरेशी आकडेवारी द्यावी, तसेच महावितरण कंपनीच्या पुरवठा क्षेत्रातील एमआयडीसीच्या भागाकरिता मर्यादित वितरण फ्रँचायसी म्हणून एमआयडीसी कशी काम करेल, हे देखील याचिकेत स्पष्ट करण्यात यावे.

(फ) महावितरण कंपनीच्या बहुवर्षिय वीज दराच्या आदेशात आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत, की जर कमी खर्चाच्या विजेच्या स्त्रोतांद्वारे होणारा विजेचा पुरवठा कमी पडत असेल तर ही तूट भरून काढण्यासाठी अतिरिक्त महागडी वीज प्राप्त करून घेण्यास आणि वीज दराच्या सरासरी दरातील फरक इंधन आकाराच्या (एफएसी) माध्यमातून वसूल करण्यास महावितरण कंपनीस मोकळीक आहे. त्यामुळे महावितरण कंपनीची ही याचिका निष्फळ ठरते.

सदर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या वेब-साईटवर उपलब्ध आहे.

**सचिव, मविनिआ**

मुंबई,
दिनांक २१ जानेवारी, २००८

**-oo-**